# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०५/१२/२०२४ अनु.क्र.२२१

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/८८२५/२०२४ अमरावती शहर दिनांक ०९/१०/२०२४**

**संदर्भ** :-१) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/ १४/ २०१४/७३ दिनांक २५/०२/२०१५

२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५

३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२ दि.२७.५.२०२२

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुद केल्या प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधील कलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद **पोलीस अंमलदार** यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे संगोपांग विचार करुन **मुदतपुर्व बदली (पदस्थापना)** करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | ब.क्र. | पोलीसअंमलदाराचे नाव | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पोहवा | 1263 | धर्मेश प्रभाकर बारापात्रे | पो.स्टे.राजापेठ | पो.मुख्यालय |

**२.पोआअ/आस्था-१/रारापोबल ते जिल्हा पोलीस हजर/१०४१६/२०२४ अमरावती शहर दिनांक ०३/१२/२०२४**

संदर्भ :- १. मा.अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं/ रारापोबल/०१/जिल्हा बदली/२०२४/१५३४, दि.१५.०७.२०२४

२. या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/रारापोबल ते जिल्हा पोलीस/८०४८/२०२४, दि.१४.१०.२०२४

३. ए कंपनी नायक, स्थानिक कंपनी नायक,मोटर परिवहन विभाग, रा.रा.पो. बल गट क्र.९, अमरावती यांचे पत्र क्र.१०४८,१२०४,१३५८,दि.३०.११.२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्र.९, अमरावती येथून पोलीस आयुक्त, अमरावती शहर या जिल्हा पोलीस दलात संदर्भाधिन क्र.१ चे आदेशान्वये बदली करण्यात

आलेली आहे. तसेच शासन निर्णय, गृह विभाग क्र.पीएमएन ०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दि.१२.०५.२०२१ मधील परि.क्र. ३ अन्वये सदर पोलीस अंमलदार यांना पोलीस हवालदार या पदावर बदलीस संदर्भाधिन क्र.२ चे पत्रान्वये स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.९, अमरावती यांचे कडील संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर कार्यमुक्त करण्यात आल्याने त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन या आस्थापनेवर हजर करण्यात येत असुन, त्यांची नेमणुक नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | नाव | मुळ घटकातुन कार्यमुक्त केल्याचा दिनांक | या घटकात हजर होण्यास आल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद | देण्यात आलेला नविन बं.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सपोउपनि /६६ | संतोष रुपला ढिमरेकर | ३०/११/२०२४ | ०१/१२/२०२४ | पोलीस हवालदार | ६२५ | पोलीस मुख्यालय अमरावती शहर |
| २. | चालक सपोउपनि /३३६ | पंकज दिनकरराव पाटील | ३०/११/२०२४ | ०१/१२/२०२४ | पोलीस हवालदार | ६१८ | मोटर परिवहन विभाग अम.शहर |
| ३. | चालक सपोउपनि /५१४ | विनोद महादेवराव वानखडे | ३०/११/२०२४ | ०१/१२/२०२४ | पोलीस हवालदार | ८५०चय | मोटर परिवहन विभाग अम.शहर |
| ४. | सपोउपनि /२९९ | प्रविण रामदास सातव | ३०/११/२०२४ | ०१/१२/२०२४ | पोलीस हवालदार | १३६३ | पोलीस मुख्यालय अमरावती शहर |

- शासन निर्णय, गृह विभाग क्र.पीएमएन ०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दि.१२.०५.२०२१ मधील तरतुदीनुसार वर नमुद पोलीस अंमलदार हे ज्या वर्षी राज्य राखीव पोलीस बलात भरती झाले आहेत. त्या भरती वर्षातील या आस्थापनेवरील पोलीस अंमलदार हे पोलीस हवालदार पदावर कार्यरत असल्याने त्यांना पोलीस हवालदार पदावर हजर करण्यात आलेले आहे. तसेच वर नमुद पोलीस अंमलदार हे राज्य राखीव पोलीस बलात ज्या वर्षी भरती झाले आहेत, त्या वर्षातील या आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गात भरती झालेल्या सर्व पोलीस अंमलदाराच्या सर्वात शेवटी त्याची सेवाजेष्ठता निश्चित करण्यात येईल.
- तसेच वर नमुद पोलीस अंमलदार याना या आस्थापनेवरील पोलीस मुख्यालयात सुरूवातीच्या दोन वर्षाकरीता सशस्त्र कार्यासाठी नियुक्त करण्यात येईल.
- सदर पोलीस अंमलदार यांची राज्य राखीव पोलीस बलातून जिल्हा पोलीस दलात विनंती वरून बदली करण्यात आल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा इत्यादी) नियम,

१९८१ च्या नियमाप्रमाणे पदग्रहण अवधी, स्थानांतरण भत्ता तसेच बदली, प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१. पोआअश/विचौ-१/निलंबन/पोहवा-१३४अमित ठाकूर/१०५३४ /२०२४, अमरावती शहर दि. ०६/१२/२०२४**

### निलंबन आदेश

१. ज्या अर्थीतुम्ही पोहवा/१३४ अमीतसिंग प्रतापसिंग ठाकूर, बॉम्ब शोधक व नाशक पथक अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दि.०५/१२/२०२४ रोजी पोलीस नियंत्रण कक्ष (सीआरओ), अमरावती शहर येथून स्टे.डा. नोंद क्रं. ३३/२४ चे १९.४५ वा. ०२ शासकिय वाहनासह, पोलीस कर्तव्य मेळावा पूणे-२०२४ येथे अत्यंत महत्वाच्या डयुटीवर अधिकारी/अंमलदार यांची टिम घेवून रवाना झाले असता कारंजा लाडसमृध्दी मार्गावर पूणे असा प्रवास सूरु असतांना कारंजासमृध्दी रोडवर चढल्यावर गाडीचे बाजूस मागील सीटवर बसून तुम्ही दारु पिवून, ड्रायव्हर सिट जवळ येवून गाडीमध्ये अचानकपणे जोर जोराने ओरडून अश्लिल शिविगाळ करुन उध्दट पणाचे व बेजबाबदार पणाचे वर्तन करुन अधिकारी व कर्मचारीतसेच प्रशासनाबाबत अर्वाच्च भाषेत बोलून अशोभनिय वर्तन करुन नैतीक अध:पतन केले आहे.

२. तुमच्या अशा बेशिस्त, बेजबाबदार, अशोभनिय कृत्यामुळेपोलीसखात्याची जनसामान्य माणसात प्रतिमा मलीन झाली आहे. तुम्ही पोलीस विभागात जबाबदार पोलीस अंमलदार या पदावर कार्यरत असून तुम्हास कायद्याचे परिपुर्ण ज्ञान असूनसुध्दातुमच्या गंभीर स्वरुपाच्या गैरवर्तणाच्या कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा जनसामान्य मानसात मलीनझाली आहे.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीसकायदा १९५१ मधील कलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदीनुसार शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहेकी, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८ (एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेकी, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतीलतो पर्यंत पोहवा/१३४ अमीतसिंग प्रतापसिंग ठाकूर, यांचे मुख्यालय पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे राहील. निलंबन काळाततुम्हाला मुख्यालयातहजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच तुम्हाला पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालयसोडता येणार नाही. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय तुम्ही मुख्यालयसोडल्यासतीतुमची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस तुम्ही पात्र ठराल, तसेच मुख्यालयी हजर नसल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा निर्वाह भत्ता गमावल्यास तुम्ही जबाबदार राहाल.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत तुम्हांसकोणत्याही प्रकारचाखाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही. खाजगी उद्योग अथवा नोकरी केली नसल्याचे प्रमाणपत्र महिना पूर्ण झाल्यानंतर

या कार्यालयाससादर करावे लागेल. जर या कालावधीत कोणतीहीखाजगी नोकरी अथवा उद्योगकेल्याचे आढळुन आल्यास तुमच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१. पोआअ/लेखा/घबाअ/झटाले/७५७०/२०२४ अमरावती शहर दिनांक २२/०८/२०२४**

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक , म.रा.मुंबई यांचे कार्यालयीन क्रमांक पोमसं/३१/३९-१/घबांअ/२०२४-२५/१३३/२०२४, दिनांक १४/०८/२०२४

**विषय :-** मागणी क्र.बी-११ मुख्य लेखा शिर्ष ७६१० शासकियकर्मचारी इत्यादींना कर्जे मधील गौणशिर्ष २०१- घरबांधणी अग्रीम बाबत. (सांकेतांक क्रमांक-७६१०००८७) मंजूर करणेबाबत

## आदेश

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशक्र.पोमसं/३१/३९-१/घबाअ/२०२४-२५/२०१/२०२४, दिनांक १४.०८.२०२४ अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मागणीक्र बी-११ मुख्य लेखाशिर्ष ७६१० शासकियकर्मचारी इत्यादीनाकर्ज मधील गौणशिर्ष २०१ (७६१०-००८७) अन्वये या कार्यालयास घरबांधणी अग्रीम निधी **रू.२४,९९,०००/- (रु.चोविस लाख नव्याण्णव हजार फक्त)** या कार्यालयास उपलब्ध करून देण्यात आला असून सदर निधी आस्थापनेवर कार्यरत खालीलप्रमाणे नमूद मंत्रालयीन लिपीक यांना **रू.२४,९९,०००/- (रू. चोवीस लाख नव्याण्णव हजार फक्त)** घरबांधणी अग्रीम म्हणून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम** | **अग्रीमाचा प्रकार** | **मंजूर रक्कम** | **कपात करावयाचे मुददल हफ्ते** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री राहुल किसनराव झटाले<br>कनिष्ठ श्रेणी लिपीक | तयार घर घेणेकरीता घरबांधणी अग्रीम | रु.२४,९९,०००/- | १३१३५ X ०१<br>१३०१५ X १९१ |
| **(अक्षरी- रू.चोवीस लाख नव्याण्णव हजार फक्त)** | | **एकूण** | **रु.२४,९९,०००/-** | |

**अटी व शर्ती**

१. शासन निर्णय वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनीयम दि.२०.०२.२०१५ तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र.०७ (१२) तरतुदीनुसार अग्रीमाच्या नियमित परतफेडी करीता **अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहतील.**

२.अग्रीम प्राप्त झाल्यानंतर ०१ महिन्याचे आत सदर अग्रीम ज्या कारणाकरीता मंजूर करण्यात आला आहे त्यांचे विनीयोजनाची कागदपत्रे **(गहाणखत, शासकिय संचलनालय यांचेकडील विमा, बोजासह ७/१२ नमुना, वारसदार यांचे संमतीपत्र,उपयोगिता प्रमाणपत्र इ.)** सादर करणे बंधन कारक राहील

३. अग्रीम मंजूर झाल्यानंतर उपरोक्त नमूद विहीत कालावधीत घरबांधणी अग्रीम विनीयोजनाची कागदपत्रे सादर न केल्यास शासन निर्णय वित्त विभाग दि.२६.०९.१९९७ अन्वये **२.७५%अतिरीक्त दराने दंडनीय व्याजासह** सदर अग्रीमाची एकरकमी वसुली करण्यात येइल.

४. नियम क्र.०३ चे कार्यवाही नंतरही अग्रीम धारक यांनी आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर न केल्यास शासन निर्णय दि.२६.०९.१९९७ मधील तरतुदीनुसार अग्रीमधारक यांचे विरूद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येइल.

५. खोटे करारनामा, गहाणखत इ. सादर करून शासनाची दिशाभूल झाल्याचे निदर्शनास आल्यास शासन निर्णय वित्त विभाग दि.२६.०९.१९९७ अन्वये आवश्यकता वाटल्यास **फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येइल.**

६. मुददलाची नियमित कपात झाल्यानंतर नियोजित व्याजाची कपात वेतनात करून घेणेबाबत सर्वस्वी जबाबदारी संबधीत
अर्जदार यांची राहील.

७. मुद्दल कपातीनंतर व्याजाची परिगणना शासनाने प्रसिद्ध केलेल्या वित्तीय वर्ष २०२४-२५ चे व्याजदरानुसार करण्यात येईल.

**८.**अग्रीमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला
तरीही घरबांधणी अग्रीमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील.

सदरचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक त्या निधीचीतरतुद सन २०२४-२०२५ मधील मुळ मंजुर अनुदानातुन करण्यात यावा तसेचसदरचा खर्च **मुख्य लेखाशिर्ष ७६१०-शासकिय कर्मचारी** इत्यादीना **कर्ज गौणशिर्ष २०१घरबांधणी अग्रीम** मागणी **क्र.ब-११ सांकेतांक क्र.७६१०००८७** मधुन वित्तीय वर्ष **सन २०२४-२०२५** च्या मुळ मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस